


# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ  Mob- 9822720784  Email- jansanchlan@gmail.com  RNI NO-MAHMAR/2022/90217


वर्ष ३ रे  अंक : ३५५ वा  बुधवार दि २९ एप्रिल २०२६  पृष्ठ ८  किमंत ३ रुपये

# शिवाजी कोण होता? वाद पेटला! मुख्यमंत्री फडणवीसांनी संजय गायकवाडांना झापले; पुस्तक वाचलय का?असा थेट सवाल...

**जनसंचलन/बुलढाणा**

राजकीय वर्तुळात खळबळ उडवणाऱ्या शिवाजी कोण होता? या गोविंद पानसरे लिखित पुस्तकावरून सुरू झालेला वाद आता राज्यस्तरावर पोहोचला आहे. आजच आंदोलकांनी बुलढाण्यात आंदोलन केले.शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांच्याशी केलेला कथित वादग्रस्त फोन कॉल सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर मोठा राजकीय भडका उडाला आहे. या घटनेवर विरोधकांनी तीव्र संताप व्यक्त करत गायकवाड यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. तर सामाजिक व साहित्यिक क्षेत्रातूनही या भाषेचा निषेध करण्यात आला आहे. दरम्यान, गोविंद पानसरे यांच्या कुटुंबीयांनीही या प्रकारावर नाराजी व्यक्त करत विचारस्वातंत्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नाराजी व्यक्त करत संजय गायकवाड यांना अप्रत्यक्षरीत्या सुनावले आहे. ज्यांनी आक्षेप घेतला आहे त्यांनी आधी शिवाजी कोण होता? हे पुस्तक वाचले आहे का?असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. या वक्तव्यानंतर राजकीय वातावरण अधिकच तापले असून






सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे. बुलढाण्यातही या मुद्द्यावर तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. पुढील काही दिवसांत या प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# पुस्तक वाचणं गुन्हा ठरलं का? पोलिसांची दंडुकेशाही संतापजनक!

**जनसंचलन/ बुलढाणा**

ज्या मातीत छत्रपती शिवरायांच्या विचारांची ज्योत पेटती ठेवली पाहिजे, त्याच भूमीत आज लोकशाहीचा गळा घोटणारी घटना घडली. ङ्गशिवाजी कोण होता?फ या पुस्तकाच्या शांततामय वाचनासाठी जमलेल्या आंदोलकांवर बुलढाणा पोलिसांनी अक्षरशः दंडुकेशाही चालवत त्यांना गुन्हेगारांप्रमाणे उचलून नेले. विचार मांडणं आणि पुस्तक वाचणं हा गुन्हा आहे का? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनासाठी राज्यभरातून शिवप्रेमी बुलढाण्यात दाखल झाले होते. जिजामाता प्रेक्षागार मैदानावर हातात पुस्तके घेऊन शांततेत आंदोलन करणाऱ्या या तरुणांना पोलिसांनी कोणतीही पूर्वसूचना न देता जबरदस्तीने हटवले. प्रकाशक प्रशांत आंबी यांना सकाळीच ताब्यात घेतल्याने पोलिसांच्या कारवाईवर संशयाचे सावट अधिक गडद झाले आहे. विशेष म्हणजे, ४३ अंशांच्या प्रचंड उष्णतेत महिला आणि तरुणी आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. मात्र, त्यांच्या संरक्षणासाठी उभारलेला मंडप आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पोलिसांनी निर्दयीपणे हटवली. सावली आणि पाण्यापासून वंचित ठेवत आंदोलन मोडून काढण्याचा हा अमानुष प्रकार संतापजनक आहे.



अप्पर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा आणि उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या कारवाईने पोलिस प्रशासनाचा कठोर आणि असंवेदनशील चेहरा उघड केला आहे. लोकशाहीत शांततेने आंदोलन करण्याचा अधिकार असताना, बुलढाण्यात मात्र बळाचा वापर करून तो चिरडला गेला. आजची ही घटना केवळ आंदोलन मोडण्याची नाही, तर विचार दडपण्याची आहे. बुलढाणा पोलिसांच्या या अरेरावीविरोधात जनतेच्या मनात संतापाचा ज्वालामुखी धुमसत असून, या घटनेचा निषेध सर्व स्तरातून होत आहे

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आमचा वाटा कुठं हाय हो?




गेले काही दिवस देशभर चर्चा आहे महिला आरक्षण ाची. संसदेचं विशेष अधिवेशन बोलावून ङ्गनारीशक्ती वंदन अधिनियमम म्हणजेच महिला आरक्षण विधेयक मंजूर करून घ्यायचं, असं नियोजन होतं. ङ्गमहिला आरक्षणाआडून मागच्या दाराने मतदारसंघांची पुनर्रचना करण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव आहे,फअसे म्हणत विरोधकांनी त्याला विरोध केला. दोन तृतीयांश मतदान न झाल्यानं विधेयक मंजूर होऊ शकलं नाही. खरं तर सत्ताधाऱ्यांचं बहुमत होतं; विधेयकाची अंमलबजावणी ५४३ मतदारसंघांत शक्य होती. याला विरोध केला असता तर विरोधक कचाट्यात सापडले असते, पण तसं घडलं नाही. उलट सत्ताधाऱ्यांना रस्त्यावरच्या खऱ्याखुऱ्या जनआक्रोशाफ्ला सामोरं जावं लागलं. एकूण काय तर पुन्हा एकदा महिला आरक्षणाचा मुद्दा बासनात गुंडाळला गेला. देशाच्या राजकीय प्रतिनिधित्वामध्ये काही जागा महिलांसाठी राखीव असाव्यात ही चर्चा आणि त्यासाठीची धडपड आजची नाही; ३३ वर्षांपूर्वीपासून ती सुरू आहे. या दृष्टीनं पाहिली पावलं उचलली गेली महाराष्ट्रात. देशातलं पहिलं महिला धोरण महाराष्ट्राने शरद पवार राज्याचे मुख्यमंत्री असताना १९९३-९४ मध्ये तयार केलं होतं. पुढच्याच वर्षी राज्यघटनेत ७३ आणि ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. ग्रामपंचायती स्वायत्त झाल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारं महाराष्ट्र देशातलं पहिलं राज्य ठरलं. २०११ मध्ये ते ५० टक्क्यांवर पोहोचलं. आता त्यालाही १५ वर्षे उलटली आहेत. खरं तर तीन दशकांमध्ये टप्प्याटप्प्याने महिलांसाठीचं आरक्षण विधिमंडळ आणि संसदेपर्यंत सहजपणे पोहोचायला हवं होतं, पण तसं घडलं नाही. या प्रयत्नांची सुरुवात झाली होती १९९६ मध्ये. एच. डी. देवेगौडा पंतप्रधान असताना संयुक्त आघाडी सरकारने हे विधेयक मांडलं. लोकसभा विसर्जित झाल्यानं ते मंजूर होऊ शकलं नाही. त्यानंतर अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात ते पुन्हा मांडण्याचे प्रयत्न झाले. मात्र, या आरक्षणाअंतर्गत ङ्गओबीसीफ आरक्षणाची मागणी आणि इतर राजकीय विरोधामुळे ते बारगळलं. पुन्हा डॉ. मनमोहनसिंग यांच्या ङ्गयूपीएफ सरकारच्या काळात, ९ मार्च २०१० रोजी ते राज्यसभेत बहुमतानं मंजूर झालं. परंतु लोकसभेत ते रखडलं. अखेर सप्टेंबर २०२३ मधील विशेष अधिवेशनात ङ्गनारीशक्ती वंदन अधिनियमम (१२८ वे घटनादुरुस्ती विधेयक) मांडलं गेलं आणि दोन्ही सभागृहात ते मंजूरही झालं. याची अंमलबजावणी झाली तर लोकसभा, राज्यांच्या विधानसभा आणि दिल्ली विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव असतील. हे आरक्षण सुरुवातीला १५ वर्षांसाठी लागू असेल, तो कालावधी संसद नंतर वाढवू शकते. विधेयकाला मंजुरी देताना एक अटही घालण्यात आली होती; आरक्षणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी पुढील जनगणना आणि मतदारसंघांच्या पुनर्रचनेनंतर होईल. ..तर असा आहे महिला आरक्षणाचा अडथळ्यांचा प्रवास. गेल्या ३० वर्षांत महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वाला कोणत्याही राजकीय पक्षाचा काहीही विरोध नाही, असं दाखवलं जातं; प्रत्यक्षात मात्र अशा काही नाट्यपूर्ण घडामोडी घडतात, की ते अंमलबजावणीच्या रेषेपर्यंत जाऊन थांबतं. कधी कोट्याअंतर्गत कोट्याचा मुद्दा असतो, कधी ङ्गओबीसींफ्ना वगळण्याचा, तर कधी महिला आरक्षणाच्या आडून मतदारसंघ वाढवण्याचा. संसदेत आणि संसदेबाहेर त्यावर घमासान चर्चा झडत राहतात. विधेयकाचे कागद फाडून भिरकावणं, माइक तोडणं, विष पिऊन आत्महत्येच्या धमक्या देणं, आक्षेपार्ह शेरेबाजी करणं, महिला सदस्यांच्या अंगावर धावून जाणं, त्यांच्या बांगड्या फुटणं... असं सगळं संसदेच्या वास्तूनं पाहिलं आहे. महिला आरक्षणासाठी आपण स्वागतशीलच आहोत, अशा बाता मारणाऱ्या सगळ्याच राजकीय पक्षांची धोरणं किंवा निर्णयप्रकियांमध्ये मोजक्याच संख्येनं महिला दिसतात. महिलांसाठी भलं-बुरं काय, हे पुरुष नेतेच ठरवतात. अगदी ताजं उदाहरण घ्या. ङ्गनारीशक्ती वंदनाफ्चा हाय व्होल्टेज ड्रामा सुरू असताना देशात काही राज्यांत विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू होती. या राज्यांत किती महिला निवडणुकीच्या रिंगणात होत्या? केरळ आणि प. बंगालमध्ये एकूण उमेदवारांपैकी ११ टक्के, तमिळनाडू पुदुच्चेरीमध्ये १४ टक्के, तर आसाममध्ये केवळ आठ टक्के! ही आहे सर्वपक्षीय ताजी नारी वंदना...




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# रिक्षा चालकांच्या मराठी भाषा सक्तीवरुन सरकारचे एक पाऊल मागे

**मुंबई/वृत्तसंस्था**

मराठी शिकण्याची तयारी असलेल्या अमराठी रिक्षा, टॅक्सी चालकांना काही काळ देणे आवश्यक आहे, अशी भूमिका परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतल्याने मराठी सक्तीवरून महायुती सरकारने एक पाऊल मागे घेतल्याचे चित्र आहे. मंगळवारी होणाऱ्या बैठकीनंतर मराठी सक्तीवर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

राज्यात रिक्षा, टॅक्सी चालकांना महाराष्ट्र दिनापासून मराठी अनिवार्य करण्याचा निर्णय परिवहन विभागाने जाहीर केल्यानंतर वाद निर्माण झाला आहे. या वादावर तोडगा काढण्यासाठी सरनाईक यांनी मंत्रालयात या निर्णयाला विरोध असणाऱ्या संघटनांची व नेत्यांची एक बैठक आयोजित केली होती. बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, कामगार नेते शशांक राव, संजय निरुपम, हजी अराफत शेख आणि सात रिक्षा व टॅक्सी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



या बैठकीत विरोधकांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. मराठीला विरोध नाही पण ज्या रिक्षा टॅक्सी चालकांना मराठी येत नाही. त्यांना मराठी शिकण्यासाठी सहा किंवा वर्षे मुदत देण्यात यावी अशी भूमिका विरोध करणाऱ्या संघटनांनी मांडली. या संदर्भात उद्या परिवहन आयुक्तालयात होणाऱ्या बैठकीनंतर निर्णय घेतला जाणार आहे.

रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी लिहिता वाचता आले पाहिजे, असा निर्णय परिवहन विभागाने पहिल्यांदा घेतला. चालक कमी शिकलेले किंवा अशिक्षित असल्याने त्यांना लिहिता येणार नाही हे लक्षात आल्यानंतर हा निर्णय रद्द करुन त्यांना किमान जुजबी बोलता आले पाहिजे असा निर्णय जाहीर करण्यात आला. मिरा भाईंदर येथील साडेतीन हजार रिक्षा चालकांची प्रायोगिक तत्वावर चाचणी घेण्यात आली. त्याचा अहवाल मंगळवारी येणार आहे. या चाचणीत ८० टक्के रिक्षा चालकांना कामापुरते मराठी बोलता येते, असे स्पष्ट झाले आहे. शिल्लक २० टक्के चालकांना मराठी शिकण्यासाठी सहा किंवा एक वर्षे मुदत देण्याची तयारी परिवहन विभागाने दर्शवली आहे. तो पर्यंत मराठी अनिवार्य करण्यास आकार देता येणार आहे.

काही परिवहन कायदे तज्ज्ञांच्या मते स्थानिक भाषा आली पाहिजे, असा नियम नाही. सरकारने परिवहन नियमात त्यासाठी सुधारणा केली आहे. ही सुधारणा अंमलात येण्यासाठी ३० ते ४० दिवस लागणार आहेत. तोपर्यंत रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी शिकण्याची संधी द्यावी, असा एक मतप्रवाह आहे. एमएमआरडीए क्षेत्रातील चालकांना मराठी शिकण्यासाठी मुदत आवश्यक आहे पण इतर ठिकाणी मराठी अनिवार्य असल्याचा नियम एक मे पासून लागू होणार आहे. रोजगारनिर्मिती हा सरकारचा प्रमुख उद्देश आहे मात्र राज्यात व्यवसाय करताना आणि सर्वसामान्य प्रवाशांशी संवाद साधताना संबंधित चालकाला व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे ही किमान अपेक्षा आहे. राज्यभाषा म्हणून मराठीला सन्मान मिळावा, यासाठी अमराठी चालकांनी ती शिकणे आवश्यक आहे, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे. मराठी भाषा शिकणार नाही ही मुजोरी सहन केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

## फुटीर गटाचे भाजपमध्ये विलीनीकरण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

आम आदमी पक्षाला (आप) सोडचिठ्ठी देऊन बाहेर पडलेले सात राज्यसभा खासदार सोमवारी अधिकृतपणे भाजपमध्ये विलीन झाले. याला राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनी संविधानातील दहाव्या अनुसूचीअंतर्गत मंजुरी दिली. त्यामुळे राज्यसभेत भाजपचे संख्याबळ ११३ झाले असून वरिष्ठ सभागृहात भाजपला बहुमतासाठी आता फक्त १० सदस्यांची आवश्यकता आहे.

पक्षांतर्गत बंदी कायद्याअंतर्गत म्हणजेच दहाव्या अनुसूचीनुसार एखाद्या पक्षातून दोन तृतीयांश सदस्य फुटून बाहेर पडले व ते अन्य पक्षामध्ये सामील झाले तर त्यांच्याविरोधात पक्षांतर्गत बंदी कायदा लागू होत नाही. 'आप'चे राज्यसभेतील १० पैकी ७ खासदार थेट भाजपमध्ये विलीन झाले असल्याने त्यांच्याविरोधात सदस्यत्व रद्द करण्याची कारवाई करता येत नाही. दहाव्या अनुसुचीअंतर्गत राज्यसभेचे सभापती राधाकृष्णन यांनी 'आप'च्या सातही खासदारांच्या भाजपमध्ये विलीन होण्यास अनुमती दिली. राज्यसभेतील भाजपच्या सदस्यांच्या सूचीमध्ये या सातही खासदारांची नावे सामील करण्यात आली आहेत.

राघव चड्ढा, हरभजन सिंह, स्वाती मालीवाल, संदीप पाठक, अशोक मित्तल, राजिंदर गुप्ता आणि विक्रमजीत सिंह साहनी या सात सदस्यांनी 'आप'चा राजीनामा दिला असून ते भाजपमध्ये विलीन झाले आहेत. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी या खासदारांचे भाजपमध्ये स्वागत केले असून त्यांचा हा निर्णय स्थिर आणि मजबूत सरकारसाठी महत्त्वाचा असल्याचे 'एक्स'वरील संदेशात म्हटले आहे. या घडामोडीनंतर राज्यसभेतील पक्षीय समीकरणात मोठा बदल झाला आहे. २४५ सदस्यांच्या वरिष्ठ सभागृहात भाजपचे संख्याबळ १०६ वरून ११३ वर पोहोचले असून 'आप'ची सदस्य संख्या १० वरून ३ वर आली आहे. 'एनडीए' आघाडीचे एकूण संख्याबळ १४८वर पोहोचले आहे. या बदलामुळे राज्यसभेत भाजप आणि 'एनडीए' आघाडी अधिक मजबूत झाली असून आगामी विधेयके मंजूर करण्यासाठी या वाढीव संख्याबळाची केंद्र सरकारला मोठी मदत होऊ शकेल.

## "भारताला एका सहीवर तेल मिळतं, आम्हाला नाही!" पाकिस्तानात पेट्रोलचा साठा संपला

**इस्लामाबाद, वृत्तसंस्था :**

इराण-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानचे केंद्रीय पेट्रोलियम मंत्री अली परवेझ मलिक यांनी पाकिस्तानच्या इंधन साठ्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. 'समा टीव्ही'च्या 'नदीम मलिक लाईव्ह' या कार्यक्रमात बोलताना त्यांनी इशारा दिला की, हे युद्ध लवकर संपताना दिसत नाहीये आणि यामुळे जागतिक ऊर्जा बाजारपेठेत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यांनी पाकिस्तानच्या मर्यादित धोरणात्मक साठ्यावर प्रकाश टाकला आणि तातडीने 'ऊर्जा सुरक्षा नियोजना'ची गरज असल्याचं सांगितलं. एकीकडे पाकिस्तानने इराण आणि अमेरिकेतील संघर्ष संपवण्याकरता मध्यस्ती केलेली असताना त्यांच्याच देशात इंधनाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे.



मुलाखतीदरम्यान पेट्रोलियम मंत्र्यांनी खुलासा केला की, पाकिस्तानकडे सध्या कच्च्या तेलाचा केवळ ५ ते ७ दिवसांचा साठा उपलब्ध आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, देशाकडे एका दिवसाचाही पेट्रोलचा साठा शिल्लक नाही, ज्यामुळे पाकिस्तानची ऊर्जा व्यवस्था अत्यंत संवेदनशील बनली आहे. त्यांच्या मते, ही परिस्थिती साठवणूक क्षमता वाढवण्याची आणि दीर्घकालीन ऊर्जा सज्जतेमध्ये सुधारणा करण्याची तातडीची गरज अधोरेखित करते. ते असेही म्हणाले की, आपल्याकडे भारतासारखं नाहीय की पेनाच्या एका सहीने आपल्याला ६० ते ७० दिवसांसाठी तेलाचा साठा मिळू शकेल. अली परवेझ मलिक यांनी सांगितले की, इतिहासात दुबई क्रूडच्या किमती कधीही १७० डॉलर्सपर्यंत पोहोचल्या नव्हत्या, जे जागतिक बाजारपेठेतील तीव्र अस्थिरतेचे लक्षण आहे. ते म्हणाले की, सरकार जनतेचे हाल कमी करण्याचा प्रयत्न करत आहे आणि शक्य तिथे सबसिडी (अनुदान) देण्याचा प्रयत्न केला आहे. इराण-अमेरिका संघर्षामुळे निर्माण झालेल्या जागतिक अनिश्चिततेमध्येही पेट्रोलची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी पाकिस्तानचे पंतप्रधान परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहेत. मंत्र्यांनी भर दिला की, जागतिक जोखीम लक्षात घेता पाकिस्तानने आपल्या ऊर्जा सज्जतेची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. देशाची अर्थव्यवस्था आणि वाहतूक व्यवस्थेत डिझेलची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, त्यामुळे त्याचे दर आणि पुरवठा खूप संवेदनशील आहे. त्यांनी असेही सांगितले की, ऊर्जा सुरक्षा सुधारण्यासाठी ३० दिवसांचा 'क्रूड ऑईल प्रोग्राम' तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## पश्चिम बंगालमध्ये भाजपचाच विजय! मोदींचा विश्वास; दुसऱ्या टप्प्याचा प्रचार समाप्त

**कोलकाता, वृत्तसंस्था :**

पश्चिम बंगालमध्ये भाजपचाच विजय होईल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी व्यक्त केला. आता ४ मेनंतर शपथविधी सोहळ्याला आपण परत येऊ, असे उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील बराकपूर येथील प्रचारसभेत बोलताना मोदी म्हणाले. राज्यात दुसऱ्या टप्प्यासाठी बुधवारी, २९ एप्रिलला मतदान होत असून ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.

प्रचाराच्या अखेरच्या दिवशी पंतप्रधान मोदी यांनी राज्यातील जनतेला उद्देशून एक पत्र लिहिले तसेच ध्वनिमुद्रित संदेशही प्रसिद्ध



केला. बंगालमध्ये प्रचारसभा घेताना आणि रोडशो करताना आपल्याला तीर्थयात्रा करत असल्यासारखे वाटले, असे ते म्हणाले. हा अनुभव अयोध्या मंदिराच्या उद्घाटनाप्रमाणेच होता, असेही त्यांनी नमूद केले. विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रचार सोमवारी संपला. अखेरच्या दिवशी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रोडशो आणि प्रचारसभांच्या माध्यमातून जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या टप्प्यात १४२ मतदारसंघांमध्ये मतदान होत आहे. राज्यात विधानसभेच्या एकूण २९४ जागा असून २३ एप्रिलला पहिल्या टप्प्यात १५२ मतदारसंघांमध्ये मतदान पार पडले. पहिल्या टप्प्यात ९१ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झाले असून दुसऱ्या टप्प्यातही विक्रमी मतदान होईल का याची उत्सुकता आहे.

निवडणुकीनंतर किमान ६० दिवस केंद्रीय सुरक्षा दले राज्यात तैनात राहतील, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोमवारी सांगितले. प्रचाराच्या अखेरच्या दिवशी बेहला येथे रोडशो केल्यानंतर शहा यांनी कोलकात्यात प्रचारसभा घेतली. ते म्हणाले, २९ तारखेला मतदान करताना गुंडांची चिंता करू नका. निवडणूक आयोगाने सुरक्षेचा चोख बंदोबस्त ठेवला आहे. मी तुम्हाला सांगतो, भाजप सत्तेत आल्यानंतरही केंद्रीय सुरक्षा दले ६० दिवस येथे राहतील.

प्रचार संपायला दोन तास उरले असताना मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दक्षिण कोलकातामध्ये रोडशो केला. तसेच त्यांनी थोडा वेळ पदयात्राही केली. त्यांच्याबरोबर राज्यसभेच्या सदस्य सागरिका घोष आणि उमेदवार अरूप बिस्वास आणि देबाशिष कुमार हे सहभागी झाले होते. दरम्यान, तृणमूल काँग्रेसच्या आरामबागच्या खासदार मिताली बाग यांनी त्यांच्या वाहनावर भाजपच्या गुंडांनी हल्ला करून नासधूस केल्याचा आरोप केला. मात्र, भाजपने हा आरोप फेटाळला.

प्रचारादरम्यान मला कालीमातेच्या भक्तांची ऊर्जा लाभली. अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेपूर्वी मी ११ दिवस उपवास केला होता. त्यावेळी श्रीरामाने मला अमर्याद ऊर्जा दिल्यासारखे वाटले होते. या निवडणुकीमध्येही मला तीच भावना जाणवली. जणू काही मी मंदिरात दर्शन घेत होतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# खामगावात डीजे वर नाचणे युवकाच्या जीवावर बेतले; धक्का लागल्याने निर्घृण हत्या

**खामगाव/प्रतीनिधी :**

लग्न समारंभात कर्ण कर्कश डीजे चे वाढते प्रस्थ सर्वच दृष्टीने घातक ठरत आहे. आरोग्यासाठी घातक ठरणारा डीजे प्रसंगी वाद व भांडणाचे निमित्त ठरत आहे. कधीकधी तर तो जीवावर देखील बेततो.

सामाजिक राजकीय दृष्ट्या संवेदनशील असलेले खामगाव शहर अशाच एका घटनेने हादरले! लग्नात डीजे वर बेभान होऊन नाचताना धक्का लागल्याचे निमित्त होऊन एका युवकाची निर्घृण हत्या करण्यात आली. ही घटना शनिवारी रात्री अकरा वाजताच्या सुमारास घडली. शहरातील बर्डे प्लॉट परिसरात निर्माण झालेला तणाव रविवारी देखील कायम आहे. परिसरात पोलिसांचा कडक बंदोबस्त लावण्यात आला असून परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.




संवेदनशील परिसर असलेल्या बर्डे प्लॉट परिसरात महेबूब चौधरी यांचे घरी लग्न होते. यासाठी लावण्यात आलेल्या डीजे वर नाचताना धक्का लागल्याच्या क्षुल्लक कारणावरून एका युवकाची चौघा युवकांनी निर्घृण हत्या केली. शोएब खान वय २३, राहणार बर्डे प्लॉट, खामगाव, जिल्हा बुलढाणा ) असे मृत युवकाचे नाव आहे.

शोएब खान अमीन खान नाचत असताना त्याचा एका युवकाला धक्का लागला. या क्षुल्लक कारणावरून अचानक वाद उफाळून आल्याने चार युवकांनी पाच जणांनी शोएब खान अमीन खान यांच्यासोबत वाद घातला. नंतर त्याला नजीकच्या जोशी ले आऊट मधील मैदानात नेले. या चौघानी शोएब खान यास प्रथम बेदम मारहाण केली. यानंतर त्यावर चाकू, वस्तरा, फायटर आणि दगडाने चौफेर हल्ला चढवीला. यात शोएब चा भीषण अंत झाला.

दरम्यान युवकाच्या हत्येने लग्न समारंभावर विरजण पडले. परिसरात गंभीर तणाव निर्माण झाला. शिवाजी नगर पोलिसांनी घटना स्थळी धाव घेत परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. प्रकरणी शेख आफताब ( बर्डे ले आउट ), फैजान खान ( बर्डे ले आऊट ), शेख तालिब ( बर्डे ले आऊट खामगाव ), शेख रफिक ( राहणार अकोला ) अशी आरोपीची नावे आहे. शिवाजी नगर पोलिसांनी या चौघा आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलम नुसार गुन्हा दाखल केला आहे. घटनास्थळी पोलिसांनी बंदोबस्त लावला असून आज रविवारी देखील बर्डे ले आऊट मधील तणाव कायम आहे.

## भाजपच्या माजी पदाधिकाऱ्यास खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी

**हिंगोली, वृत्तसंस्था :**

शहरातील एका भाजपच्या माजी पदाधिकाऱ्याला महिलेसोबतच्या वादातून खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

प्राप्त माहितीनुसार 'लिव्ह-इन रिलेशन'मधील वादातून पैशाच्या उकळपट्टीचा हा गंभीर प्रकार असल्याची प्राथमिक माहिती आहे. अत्याचाराच्या खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देत लाखो रुपयांची मागणी केल्याप्रकरणी संबंधित महिलेविरुद्ध आशिष वाजपेयी यांच्या तक्रारीवरून हिंगोली ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार आशिष वाजपेयी हे शहरातील बळसोंड परिसरातील रहिवासी असून ते भाजपचे माजी पदाधिकारी आहेत. ते 'युवा विकास सोसायटी'च्या माध्यमातूनशासनाच्या प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेअंतर्गत काम पाहत होते. याच कामाच्या निमित्ताने नांदेड जिल्ह्यातील एका महिलेशी त्यांची ओळख झाली. पुढे या ओळखीचे रूपांतर जवळीकतेत झाले आणि गेल्या दोन वर्षांपासून दोघे 'लिव्ह-इन रिलेशन'मध्ये राहत होते. तक्रारीनुसार, या नात्याचा आधार घेत संबंधित महिलेने वारंवार पैशांची मागणी सुरू केली. वाजपेयी यांनी आतापर्यंत सुमारे २० लाख रुपये रोख, पाच तोळे सोने तसेच एक, तीन आणि सहा लाख रुपयांचे धनादेश दिल्याचे नमूद केले आहे. मात्र, मागण्या थांबत नसल्याने त्यांनी पुढील रक्कम देण्यास नकार दिला. यामुळे संतप्त झालेल्या महिलेने अत्याचाराचा खोटा गुन्हा दाखल करून बदनामी करण्याची तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. सततच्या त्रासाला कंटाळून आशिष वाजपेयी यांनी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात धाव घेतली.व या प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिस निरीक्षक शामकुमार डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. दरम्यान हिंगोली जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात भाजप पदाधिकाऱ्यास खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी मिळाल्यानंतर खळबळ उडाली.

## महिला अधिकाऱ्याला भाजपा मंत्र्याच्या भावाकडून धमकी

**इंदोर :** मध्य प्रदेशातील एका विद्यमान मंत्र्याच्या भावाविरुद्ध अलिराजपूरमध्ये जनपद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला (CEO) धमकावल्याप्रकरण गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने महिला अधिकाऱ्याला तिचे 'दात तोडण्याची' आणि 'जिवंत गाडण्याची' धमकी दिल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

आरोपीची ओळख इंदर सिंग चौहान अशी झाली असून, तो अनुसूचित जाती कल्याण विभागाचे कॅबिनेट मंत्री नागर सिंग चौहान यांचा भाऊ आहे. मंत्री चौहान यांनी तो आपला भाऊ असल्याचे मान्य केले असले तरी, आरोपांवर भाष्य करण्यास नकार दिला आहे. "तो माझा भाऊ आहे आणि एफआयआरमध्ये त्याचे नाव आहे", असं त्यांनी 'द इंडियन एक्सप्रेस'शी बोलताना सांगितले. भाजपा आमदार प्रीतम सिंह लोधी यांनी नुकतंच पोलीस अधिकाऱ्यांना धमकावलं होतं, त्यानंतर लगेचच ही घटना समोर आली आहे. मंत्री चौहान यांच्या भावाच्या या कृत्याचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले असून, त्यामध्ये तो दोन व्यक्तींनी रोखलेले असतानाही महिला अधिकाऱ्याच्या दिशेने धावून जाताना दिसत आहे.

## हत्येचा गुन्हा उकलं.... किरकोळ वादातून दगडाने ठेचून केली हत्या..

**मुंबई, वृत्तसंस्था :**

नवी मुंबई महानगर पालिका मुख्यालयाच्या समोरील उड्डाणं पुलाखाली एका व्यक्तीची ठेचून हत्या झाल्याचे समोर आले होते. पोलिसांनी आठ दिवसात या गुन्ह्यांची उकलं करण्यात यश मिळवले आहे. यात एका आरोपीला अटक करण्यात आले असून दुसरा फरार आहे.

१७ एप्रिल रोजी पहाटे नवी मुंबई मनपा समोरील उड्डाणं पुलाखाली एक मृतदेह आढळून आला होता. त्याला दगडाने ठेचून मारण्यात आले होते. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंद करून तपास चक्रे फिरवली. यातील मयत व्यक्तीची ओळख पटवण्यात यश आले असून आकाश प्रकाश राठोड (वय ३१) असे त्याचे नाव आहे. ओळख पाटल्यावर तांत्रिक तपासात सुभाष छन्नूलाल ध्रुवे (वय २७) हे नाव समोर आले. त्याचा शोध घेत त्याला याच परिसरातून शनिवारी अटक करण्यात आली. त्याने हत्येची कबुली दिली असून यात अजून एका आरोपीचा समावेश आहे. त्याचा शोध पोलीस घेत आहेत. याबाबत अधिक माहिती देताना सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ यांनी सांगितले कि दोन संशयित आरोपी आणि मयत आकाश हे अनेक वर्षांपासून मित्र होते. अटक आरोपीने दिलेल्या माहिती नुसार तिघांना मद्याचे व्यसन होते. या व्यसनाच्या अमलाखाली त्यांनी ही हत्या केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. तिसरा संशयित आरोपीला अटक केल्यावर नेमकी पूर्ण माहिती समोर येईल. ज्याची हत्या झाली तो आकाश राठोड त्याला ठार मारणारा सुभाष ध्रुवे आणि अन्य एक हे तिघेही मित्र आहेत. मिळेल ते काम करून जेवण आणि मद्याचे पैसे जमले कि पीत बसायचे असा अनेक महिन्या पासून त्यांचा दिनक्रम होता. त्यांची किरकोळ कारणांनी अनेकदा भांडण हाणामारीही झाली होती. १७ तारखेला ते नेहमी प्रमाणे उड्डाणं पुलाखाली मद्य पीत बसले होते. येथेच्छ मद्य प्राशन केल्यावर त्यांनी सोबत आणलेले जेवण करण्यास सुरवात केली. मात्र जेवणावरून वाद सुरु झाले त्यात सुभाष आणि अन्य एकाने मिळून आकाश याला बेदम मारले. त्यांचा राग शांत न झाल्याने त्यांनी तिथेच पडलेल्या दगडानी त्याच्यावर मारा केला. त्यातच आकाश याचा मृत्यू झाला.

# पतीचा सख्ख्या बहिणीसोबतचा फोटो दाखवून पत्नीचा दुसऱ्या लग्नाचा कांगावा, कोर्टाला फसवून घटस्फोट घेतला !

**ग्वाल्हेर/वृत्तसंस्था**

गेल्या काही वर्षांमध्ये घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. वेगवेगळ्या कारणांसाठी घटस्फोट घेतल्याची वा घटस्फोटाची मागणी करणारी प्रकरणं देशभरातल्या न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. पण अनेक ठिकाणी ही प्रकरणं म्हणजे एका बाजूने दुसऱ्या बाजूवर अन्यायकारक पद्धतीने लादलेले आरोपच असल्याचंही सुनावणीतून स्पष्ट होतं. पण ग्वाल्हेरमध्ये समोर आलेल्या एका अजब प्रकरणात पत्नीनं चक्क न्यायालयालाच फसवून पतीपासून घटस्फोट मिळवल्याचं स्पष्ट झालं आहे. पतीचं दुसरं लग्न झाल्याचा दावा करण्यासाठी पत्नीनं चक्क पतीचा त्याच्या सख्ख्या बहिणीसोबतचा फोटोच न्यायालयात सादर केला!




मध्य प्रदेशच्या ग्वाल्हेरमधला हा सगळा प्रकार आहे. एका महिलेनं कुटुंब न्यायालयात घटस्फोटासाठी याचिका दाखल केली होती. आपल्या पतीनं दुसरं लग्न केल्याचा दावा या महिलेनं केला होता. विशेष म्हणजे आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ सदर महिलेनं पतीचा दुसऱ्या एका महिलेसोबतचा फोटोदेखील न्यायालयाला सादर केला होता. सादर झालेले पुरावे व महिलेचा युक्तिवाद या आधारावर न्यायालयानेदेखील फक्त महिलेच्या याचिकेवर घटस्फोट मंजूर केल्याचा निकाल देऊन टाकला. पण नंतर खरा प्रकार समोर आला आणि सगळ्यांनाच धक्का बसला!

१९९८ साली सदर महिलेचा विवाह झाला होता. कौटुंबिक वादांमुळे लग्नाच्या १७ वर्षांनंतर म्हणजे २०१५ सालापासून ते दोघे एकमेकांपासून स्वतंत्र राहात आहेत. पण असं असलं, तरी पतीने घटस्फोट देण्यास नकार दिल्यामुळे सदर महिलेनं २०२१ साली घटस्फोटासाठी ग्वाल्हेरच्या कुटुंब न्यायालयात याचिका साद केली होती. पतीनं दुसरं लग्न केल्याचा दावा महिलेनं न्यायालयासमोर केला. पुराव्यादाखल तिने दिलेल्या फोटोमध्ये पतीसोबत त्याची दुसरी पत्नी असल्याचंही तिने नमूद केलं. पण प्रत्यक्षात पतीसोबत त्याची सख्खी बहीण आणि इतर कुटुंबीय त्या फोटोत होते. कुटुंब न्यायालयाने नुकताच सदर महिलेला घटस्फोट मंजूर केला.

एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संबधित पतीला कुटुंब न्यायालयाने घटस्फोट मंजूर करण्याच्या दिलेल्या आदेशांबाबत समजलं. याबाबत अधिक चौकशी केली असता आपल्या पत्नीने बहिणीसोबतचा आपला फोटो न्यायालयासमोर दुसरं लग्न झाल्याच्या दाव्यासाठी सादर केल्याचा धक्कादायक प्रकार पतीला समजला. यानंतर पतीने कुटुंब न्यायालयाच्या आदेशांविरोधात ग्वाल्हेर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. पत्नीने न्यायालयाची फसवणूक करून घटस्फोट मिळवल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. यासंदर्भात उच्च न्यायालयात अद्याप सुनावणी सुरू झालेली नसून या सुनावणीत संबंधित घटस्फोटाच्या वैधतेवर सविस्तर युक्तिवाद होण्याची शक्यता आहे.

# आरसीबीचा दिल्लीवर दणदणीत विजय!

# हेझलवूड-भुवनेश्वरसमोर दिल्लीने गुडघे टेकले

■ मुंबई, वृत्तसंस्था :

आरसीबी आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियममध्ये सामना खेळवण्यात आला. या सामन्यात आरसीबीने आपला दबदबा राखला आणि ८१ चेंडूत राखून दणदणीत विजय मिळवला. या सामन्यात आरसीबीच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत दिल्लीला अवघ्या ७६ धावांवर सर्वबाद केलं. गेल्या सामन्यात २६४ धावा आणि या सामन्यात दिल्लीचा संघ फक्त ७५ धावा करू शकला. यामागचं कारण म्हणजे जोश हेझलवूड आणि भुवनेश्वर कुमारची भेदक गोलंदाजी.

दिल्लीने दिलेल्या ७६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीने अवघ्या ६.३ षटकांत सामना जिंकला. जेकब बेथल व विराट कोहलीच्या जोडीने डावाला सुरूवात केली. जेकब बेथलने या सामन्यात २ गगनचुंबी षटकार लगावत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. बेथल २० धावा करत काईल जेमिसनच्या गोलंदाजीवर बाद झाला. नटराजनने उत्कृष्ट झेल टिपत त्याला बाद केलं. यानंतर विराट कोहली व देवदत्त पडिक्कल यांनी संघाला विजय मिळवून दिला. आपल्या वादळी फॉर्मात असलेल्या पडिक्कलने अवघ्या १३ चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह ३४ धावांची खेळी केली. तर विराट कोहलीने १५ चेंडूत १ चौकार व २ षटकारांसह २३ धावांची खेळी केली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी करत संघाचा विजय सोपा केला.

## कॅपिटल्स ७६ धावांवर ऑलआऊट



विराट कोहलीने या सामन्यात ११ धावा करताच मोठा टप्पा गाठला. विराटने आयपीएलमध्ये ९ हजार धावांचा पल्ला पार केला. विराट हा आयपीएलमध्ये ९ हजार धावा करणारा पहिला खेळाडू आहे.

आरसीबीने नाणेफेक जिंकत दिल्लीला गोलंदाजीसाठी पाचारण केलं. दिल्लीची सर्वात खराब सुरूवात झाल्याने संघ अवघ्या १०० धावाही करू शकला नाही. दिल्लीने ४ षटकांत ६ विकेट्स गमावल्या. भुवनेश्वर कुमारने पहिल्या षटकात साहिल पारखला क्लीन बोल्ड केलं. त्यानंतर जोश हेझलवूडने दुसऱ्या षटकात केएल राहुल व समीर रिझवी यांनी बाद करत माघारी धाडलं. यानंतर ट्रिस्टन स्टब्स व अक्षर पटेलला भुवनेश्वर कुमारने झेलबाद केलं. हेझलवुड व भुवनेश्वर कुमारने कसोटी क्रिकेटमधील लाईन लेंग्थसह दिल्लीची अवस्था बिकट केली. यासह पॉवरप्लेमध्ये दिल्लीची स्थिती ६ बाद १३ अशी होती.

डेव्हिड मिलर व अभिषेक पोरेल यांनी ३५ धावांची भागीदारी रचली होती. पण रसिख दर सलामने मिलरला झेलबाद करत संघाला मोठी विकेट मिळवून दिली. मिलर १९ धावा करत बाद झाला, यानंतर काईल जेमिसनने १२ धावांची खेळी केली. जेमिसनला कृणाल पंड्याने पायचीत केलं. यानंतर कुलदीप यादवला सुयश शर्माने क्लीन बोल्ड केलं. तर अभिषेक पोरेल ३३ चेंडूत ३ चौकारांसह ३० धावा केल्या. अभिषेक पोरेलला जोश हेझलवूडने १७व्या षटकात क्लीन बोल्ड केलं. यासह दिल्लीचा संघ फक्त ७५ धावांवर सर्वबाद झाला.

आरसीबीकडून या सामन्यात जोश हेझलवूडने ३.३ षटकांमध्ये १२ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. तर भुवनेश्वर कुमारने ३ षटकांत फक्त ५ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. यादरम्यान भुवनेश्वरची इकॉनॉमी १.७० होती. याशिवाय सुयश शर्मा, कृणाल पंड्या, रसिख सलाम दर यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.

## भारताच्या गोलंदाजाचा तिरस्कार वाटतो, संधी मिळाली तर.., पाकिस्तानी खेळाडूचं विधान

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेटच्या मैदानावरील द्वंद्व आपल्या सर्वांनाच माहित आहे. दोन्ही संघांमध्ये कायमच हायव्होल्टेज लढती पाहायला मिळाल्या आहेत. या दोन्ही संघांमधील ही स्पर्धा केवळ मैदानातील कामगिरीमुळेच नव्हे, तर खेळाडूंची वक्तव्ये, हावभाव आणि मैदानाबाहेरील वादांमुळेही अनेकदा ठळकपणे दिसून येते. अलीकडेच, युवा पाकिस्तानी खेळाडू हसन नवाझने भारतीय गोलंदाजांवर जहाल टीका केली, जी आता व्हायरल होत आहे.

पाकिस्तान सुपर लीग २०२६ दरम्यान भारतीय गोलंदाजांविरुद्ध बोलणाऱ्या पाकिस्तानी फलंदाज हसन नवाझचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये, एका स्थानिक वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत हसन नवाझला विचारण्यात आलं की, जगातील कोणत्या गोलंदाजाविरुद्ध त्याला सर्वाधिक धावा करायच्या आहेत. त्यावर उत्तर देताना त्याने भारताच्या गोलंदाजांचा उल्लेख केला.

हसन नवाझ उत्तरादाखल म्हणाला, “आम्ही नेहमी भारतीय संघाच्या गोलंदाजांविरुद्ध धावा करण्याचा विचार करतो. हे अगदी सोपं आहे, आम्हाला त्यांच्या प्रत्येक गोलंदाजाचा तिरस्कार वाटतो. देवाची इच्छा असेल आणि आम्हाला संधी मिळाली, तर भविष्यात आम्ही अधिकाधिक धावा करण्याचा नक्कीच प्रयत्न करू.” हसन नवाझने असंही म्हटलं की,





भारताविरुद्ध खेळताना त्याला स्वाभाविकपणे अधिक प्रेरणा मिळते. मात्र, आतापर्यंत त्याला भारतीय संघाविरुद्ध फार मोठी कामगिरी करता आलेली नाही. महत्त्वाचं म्हणजे हसन नवाझ भारताविरुद्ध फक्त एकच सामना खेळला आहे. त्या सामन्यात तो केवळ ५ धावांवर बाद झाला होता. हसन नवाझने २०२५ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. आतापर्यंत त्याने २५ टी-२० सामने खेळले असून, त्यात दोन अर्धशतकं आणि एका शतकासह २०.७७ च्या सरासरीने आणि १५४.३९ च्या स्ट्राइक रेटने ४५७ धावा केल्या आहेत. दरम्यान, पाकिस्तान सुपर लीग २०२६ मधील त्याची कामगिरी तुलनेने सामान्य राहिली आहे. हसनने १० सामन्यांमध्ये केवळ दोन अर्धशतकांसह फक्त २९१ धावा केल्या आहेत.

## रघुवंशीवर BCCIची कारवाई!

■ मुंबई/वृत्तसंस्था

लखनौ सुपर जायंट्स आणि कोलकाता नाईट रायडर्सच्या सामन्यात मोठा वाद पाहायला मिळाला. अंगक्रिश रघुवंशी ऑबस्ट्रक्टिंग द फिल्डमुळे बाद देण्यात आलं होतं. हे पाहून सर्वच जण अवाक् झाले, अंगक्रिश रघुवंशीदेखील पंचांशी हुज्जत घालत होता आणि अभिषेक नायरदेखील चौथ्या पंचांशी वाद घालताना दिसला. या सर्व प्रकरणानंतर अंगक्रिश रघुवंशी चर्चेत असताना त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

पहिल्या डावातील पाचव्या षटकातील अखेरच्या चेंडूवर रघुवंशी हलक्या हाताने खेळलेल्या फटक्यानंतर धाव घेण्यासाठी धावू लागला. तितक्यात ग्रीनने त्याला पुन्हा क्रीजवर जाण्याचा इशारा केला. त्यानंतर मागे परतताना रघुवंशी वेगळ्या अँगलमध्ये धावला. ज्यामुळे स्टंपच्या दिशेने फेकलेला चेंडू त्याच्या शरीराला लागला. यामुळे मोहम्मद शमी व ऋषभ पंत यांनी ऑबस्ट्रक्टिंग द फिल्डसाठी अपील केलं. तिसऱ्या पंचांनीही व्हीडिओ पाहिल्यानंतर तो




चेंडूच्या मध्ये आल्याचं सांगत त्याला बाद दिलं.

अंगक्रिश रघुवंशी बाद दिल्यानंतर पंचांशी चर्चा करताना दिसला. पंचांनी त्याला समजावत मैदानाबाहेर जाण्यास सांगितलं. मैदानाबाहेर जात असताना रघुवंशीने रागात बॅट बाऊंड्री रोपवर मारली आणि हेल्मेट फेकून देत आपला संताप व्यक्त केला. याचाच फटका आता त्याला बसला आहे. आयपीएल निवेदनात म्हटलं आहे की, कोलकाता नाईट रायडर्सचा फलंदाज आणि यष्टिरक्षक अंगक्रिश रघुवंशी याच्यावर लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात (मॅच क्र. ३८) आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल कारवाई करण्यात आली आहे. त्याच्या सामन्याच्या मानधनातून २० टक्के दंड आकारण्यात आला असून त्याला एक डिमेरिट पॉइंटही देण्यात आला आहे.

## पहिल्यांदाच असं घडलं! दिल्ली कॅपिटल्सच्या नावे नकोसा रेकॉर्ड..



■ हैदराबाद/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ स्पर्धेत आतापर्यंत तरी फलंदाजांचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. दिल्ली कॅपिटल्सने याआधी पंजाब किंग्ज संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात २६४ धावांचा डोंगर उभारला होता. ही या हंगामातील सर्वोच्च धावसंख्या होती. तरीदेखील दिल्लीला पराभवाचा सामना करावा लागला होता. आता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात दिल्लीच्या फलंदाजांचा सुपर फ्लॉप शो पाहायला मिळाला आहे. यासह दिल्ली कॅपिटल्सच्या नावे नकोसा रेकॉर्ड नोंदवला गेला आहे.

अरुण जेटली स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा संपूर्ण डाव अवघ्या ७५ धावांवर आटोपला. यादरम्यान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघातील गोलंदाजांनी दमदार गोलंदाजी केली. सुरुवात चांगली मिळाली की शेवट चांगला होतो. पण दिल्लीला हवी तशी सुरुवात करता आली नाही. पावरप्लेमध्ये फलंदाजी करताना दिल्लीचे अवघ्या १३ धावांवर ६ फलंदाज तंबूत परतले होते. ही आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वात कमी धावसंख्या आहे. दिल्ली कॅपिटल्सचा संघ हा पावरप्लेमध्ये सर्वात कमी धावा करणारा संघ ठरला आहे. दिल्ली कॅपिटल्स एकापेक्षा एक स्फोटक फलंदाज आहेत. पण रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या धारदार गोलंदाजीसमोर सर्व फलंदाजांनी नांग्या टाकल्या. यासह १३ धावसंख्येवर ६ फलंदाज बाद होऊन माघारी परतले. तर याआधी पावरप्लेमध्ये सर्वात कमी धावा करण्याचा रेकॉर्ड हा राजस्थान रॉयल्स संघाच्या नावे होते. या संघाने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात ३ गडी बाद अवघ्या १४ धावा केल्या होत्या. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना दिल्ली कॅपिटल्सचा डाव अवघ्या ७५ धावांवर आटोपला. दिल्लीकडून अभिषेक पॅरिलने सर्वाधिक ३० धावांची खेळी केली. तर उर्वरीत कुठल्याही फलंदाजाला हवी तशी कामगिरी करता आली नाही. या धावांचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने ८१ चेंडूं शिल्लक ठेवून सामना आपल्या नावावर केला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आईची आठवण आणि बिग बी झाले भावुक

**मुंबई :** अमिताभ बच्चन हे केवळ अभिनयासाठीच नव्हे, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वासाठीही देशभरात आदरणीय मानले जातात. सध्या सोनी टीव्हीवर सुरू असलेल्या लोकप्रिय रिॲलिटी गेम शो 'कौन बनेगा करोडपती १७' मध्ये त्यांच्या ८३व्या वाढदिवसानिमित्त विशेष एपिसोड प्रसारित करण्यात आला. या एपिसोडमध्ये जे घडलं, त्याने केवळ प्रेक्षकांचेच नव्हे, तर खुद्द बिग बींच्याही डोळ्यांत पाणी आणलं.

या खास भागात प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर आणि अभिनेता-निर्देशक फरहान अख्तर यांनी पाहुणे म्हणून हजेरी लावली. त्यांच्या उपस्थितीत प्रसारित करण्यात आलेल्या एका व्हिडिओ क्लिपमध्ये अमिताभ बच्चन यांच्या आई, स्वर्गीय तेजी बच्चन यांचे एक जुने वक्तव्य दाखवण्यात आले. त्या म्हणाल्या होत्या, ङमी खूप भाग्यशाली आहे. आता मी जिथेही जाते, लोक मला माझ्या मुलामुळे प्रेम आणि सन्मान देतात. एका आईसाठी याहून मोठं भाग्य काय असू शकतं?ङ आईच्या



या भावना ऐकताच अमिताभ भावूक झाले आणि त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

या क्षणाने संपूर्ण स्टुडिओमध्ये भावनांचा एक जिवंत वातावरण तयार झाला. एपिसोडमध्ये पुढे अमिताभ यांनी २००४ मध्ये आलेल्या 'लक्ष्य' या चित्रपटातील अनुभव शेअर केला. फरहान अख्तरने दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाच्या आठवणी सांगताना ते म्हणाले, ङत्या वेळी फरहान रात्री माझ्या खोलीत आला आणि विचारलं, 'अमिताभ अंकल, काही त्रास तर नाही ना?' आम्हाला वाटलं की, हा तर उस्ताद आहे - आम्हाला शिकवतोय की अभिनय कसा करायचा.

शोदरम्यान, एक गंमतीदार प्रसंगही घडला. जेव्हा फरहानने दोघांनाही विचारलं की, तुमच्यापैकी महिलांमध्ये कोण अधिक लोकप्रिय आहे? त्यावर अमिताभ यांनी लगेच जावेद अख्तर यांच्याकडे बोट दाखवलं. त्यावर जावेद साहब म्हणाले, हे काय प्रश्न आहे? हे विचारायची गोष्ट आहे का? आणि त्यांनी अमिताभ यांना हसत हसत सांगितलं, ङसगळं उघड करू नकोस. या विशेष भागाने प्रेक्षकांना केवळ मनोरंजनच नाही, तर भावना आणि स्नेहानेही भारावून टाकलं. वाढदिवसाच्या निमित्ताने प्रसारित झालेला हा कार्यक्रम अमिताभ बच्चन यांच्या आयुष्यातील एका महत्त्वाच्या क्षणाची साक्ष ठरला. त्यांचं आईवरचं प्रेम, कृतज्ञता आणि नम्रता याचा प्रत्यय या क्षणातून पुन्हा एकदा दिसून आला.



# बॉडी बिल्डर वरिंदर घुमनचा हार्ट अटॅकने मृत्यू

**नवी दिल्ली :** पंजाबी फिल्म इंडस्ट्रीतून एक वाईट बातमी आली आहे. अभिनेता आणि बॉडी बिल्डर वरिंदर सिंह घुमनचं निधन झालं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हृदयविकाराच्या झटक्याने त्याचं निधन झालं आहे. यानंतर चाहत्यांना धक्का बसला आहे. वरिंदरच्या मृत्यूच्या बातमीनंतर एकच शोककळा पसरली आहे. असं म्हटलं जात आहे की वरिंदर अमृतसरमधील फोर्टिस रुग्णालयात त्याच्या दुखापतीसाठी किरकोळ शस्त्रक्रिया करण्यासाठी गेला होता. तो घरी एकटाच निघून गेला होता. ही एक किरकोळ शस्त्रक्रिया असल्याने तो आज परतणार होता, परंतु अचानक त्याला हृदयविकाराचा झटका आला आणि त्याचं निधन झालं.

वरिंदर सलमान खानसोबत 'टायगर ३' चित्रपटात दिसला होता. त्याच्या बॉडी बिल्डिंग कौशल्याचं सर्वांनी कौतुक केलं होतं. सलमानचे चाहते त्याच्या शरीरयष्टीने मंत्रमुग्ध झाले होते. हा चित्रपट २०२३ मध्ये प्रदर्शित झाला होता. जेव्हा चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला तेव्हा वरिंदर त्याच्या पर्सनॅलिटीमुळे चाहत्यांमध्ये लोकप्रिय झाला. वरिंदरला फिटनेसचं फार वेड होतं. तो 'मिस्टर इंडिया २००९' चा विजेता होता. शिवाय, तो 'मिस्टर एशिया चॅम्पियनशिप' मध्येही दुसऱ्या क्रमांकावर राहिला होता. 'द ही-मॅन ऑफ इंडिया' म्हणून तो ओळखला जात होता.

***

# साऊथच्या 'लेडी सुपरस्टार'चे हे ५ चित्रपट तुम्हाला थक्क करतील



**हैदराबाद : दक्षिण भारतीय सुपरहिट अभिनेत्री नयनतारा आज चित्रपटसृष्टीत २२ वर्षे साजरी करत आहे. तिला दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीची 'लेडी शाहरुख' म्हणून ओळखले जाते. ४० वर्षीय या अभिनेत्रीने २००३ मध्ये मल्याळम चित्रपटसृष्टीतून तिच्या चित्रपट कारकिर्दीला सुरुवात केली. आज ती मल्याळम, तमिळ, तेलगू आणि कन्नड चित्रपटसृष्टीवर राज्य करते. २०२३ मध्ये तिने शाहरुख खानच्या 'जवान' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. नयनतारा तिच्या २२ वर्षांच्या चित्रपट कारकिर्दीत ७५ हून अधिक चित्रपटांमध्ये दिसली आहे. आपण या अभिनेत्रीबद्दल पाच अवश्य पहावे अशा चित्रपटांवर चर्चा करू.**

---------------

**आरम :** २०१७ च्या थ्रिलर सोशल ड्रामा चित्रपट 'आरम' मध्ये, नयनताराने एका संग्राहकाची भूमिका केली होती जो एका गावकऱ्याच्या पाण्याच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी प्रशासनाशी लढतो. या चित्रपटाचे दिग्दर्शन गोपी नैनार यांनी केले होते. तुम्ही तो Amazon Prime Video वर पाहू शकता.

----------------

**राजा आणि राणी :** जर तुम्हाला नयनताराच्या तमिळ रोमँटिक-कॉमेडियन चित्रपटांमध्ये रस असेल, तर तुम्ही अभिनेत्रीचा १२ वर्षे जुना चित्रपट, राजा राणी पाहू शकता. या चित्रपटात आर्या मुख्य भूमिकेत आहे. हा चित्रपट 'जवान' चे दिग्दर्शक ॲटली यांचा दिग्दर्शनात पदार्पण आहे, जो ब्लॉकबस्टर होता. तुम्ही हा चित्रपट YouTube वर मोफत पाहू शकता.

----------------

**नानुम राऊडी धान :** विजय सेतुपती आणि नयनतारा स्टारर 'नानुम राउडी धन' हा चित्रपट पाहून तुम्हाला खूप आनंद होईल. २०१५ मध्ये प्रदर्शित झालेला हा ॲक्शन कॉमेडी चित्रपट तुम्हाला हादरवून टाकेल. तमिळ सुपरस्टार धनुष निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन नयनताराचे पती विघ्नेश शिवन यांनी केले आहे. संगीत अनिरुद्ध रविचंदर यांनी दिले आहे. चित्रपटात, नयनताराला एका स्फोटात बहिरे केले जाते, परंतु ती त्या स्फोटाची एकमेव साक्षीदार आहे. चित्रपटाचा कळस म्हणजे ती गुन्हेगारांना कसे ओळखते. तुम्ही 'आह' वर चित्रपट पाहू शकता.

----------------

**कोलामावू नाईटिंगेल :** नयनताराच्या सुपरहिट चित्रपटांपैकी, 'कोलामावू कोकिला' हा क्राइम-कॉमेडी चित्रपट चुकवू नका. ८ कोटी बजेटमध्ये बनलेला या चित्रपटाने ७० कोटींपेक्षा जास्त कमाई केली. २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन नेल्सन दिलीपकुमार यांनी केले होते, ज्यांनी यापूर्वी रजनीकांतसोबत 'जेलर', थलापती विजयसोबत 'बीस्ट' आणि शिवा कार्तिकेयनसोबत 'डॉक्टर' असे चित्रपट बनवले आहेत. 'कोलामावू कोकिला'च्या कथेबद्दल बोलायचे झाले तर, ही एका मुलीची कथा आहे जी तिच्या आईच्या कर्करोगाच्या उपचारासाठी पैसे देण्यासाठी ड्रग्ज तस्करीत अडकते. 'कोलामावू कोकिला' हा चित्रपट ZEE5 वर पाहता येईल.

----------------

**जवान :** नयनताराने २० वर्षांनंतर बॉलिवूडमध्ये पदार्पण केले आणि ती खळबळजनक बनली. या अभिनेत्रीने शाहरुख खानसोबत 'जवान' या चित्रपटात काम केले होते, जिथे तिने एका पोलिस अधिकाऱ्याची भूमिका केली होती. 'जवान'चे दिग्दर्शन ॲटली यांनी केले होते. 'जवान' हा शाहरुख खान आणि नयनताराचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे, तसेच ॲटलीचाही सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे, ज्याने जगभरात १,१०० कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात उन्हाचा चटका वाढला; कमाल तापमानाचा पारा ४३.६ अंशांवर

## विदर्भात अमरावती आणि वर्धा सर्वाधिक उष्ण; नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

विदर्भात सध्या उष्णतेची लाट जाणवू लागली असून बुलढाणा जिल्ह्यातही उन्हाचा तडाखा वाढला आहे. सोमवारी जिल्ह्यात कमाल तापमानाची नोंद ४३.६ अंश सेल्सिअस इतकी करण्यात आली असून, सरासरीच्या तुलनेत तापमानात ४ अंशांनी वाढ झाली आहे. वाढत्या उन्हामुळे दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत असून नागरिकांना उष्माघाताचा त्रास जाणवू लागला आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, २७ एप्रिल रोजी बुलढाणा जिल्ह्याचे किमान तापमान ३०.५ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. हवेतील आर्द्रता सायंकाळच्या सुमारास २१ टक्क्यांपर्यंत खाली आल्याने कोरड्या उन्हाचा प्रभाव अधिक जाणवत आहे. संपूर्ण विदर्भ सध्या उष्णतेने होरपळून निघत आहे. सोमवारी विदर्भातील विविध शहरांमधील तापमानाची स्थिती खालीलप्रमाणे राहिली: विदर्भातील अमरावती (४६.६ ) आणि वर्धा (४६.५) ही शहरे सर्वाधिक उष्ण ठरली आहेत. त्यानंतर अकोला येथे ४६.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. नागपूरमध्ये ४५.० अंश, चंद्रपूरमध्ये ४५.२ अंश आणि यवतमाळमध्ये ४५.२ अंश इतके कमाल तापमान नोंदवले गेले. गोंदिया (४१.०) आणि भंडारा (४२.०) या जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा इतर जिल्ह्यांच्या तुलनेत थोडा कमी राहिला. नागरिकांना खबरदारीचे आवाहन : जिल्ह्यात वाढत असलेल्या उष्णतेमुळे जिल्हा प्रशासनातर्फे नागरिकांना दुपारी १२ ते ४ या वेळेत काम नसेल तर घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उन्हापासून बचाव करण्यासाठी पुरेसे पाणी पिणे, सुती कपड्यांचा वापर करणे आणि उष्माघाताची लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे सूचित करण्यात आले आहे.

# पालकमंत्री मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा

जनसंचलन/बुलढाणा

राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील हे दि. २९ एप्रिल ते १ मे २०२६ दरम्यान तीन दिवसांच्या जिल्हा दौऱ्यावर येणार असून विविध विभागांचा आढावा घेणार आहेत. तसेच महाराष्ट्र दिनानिमित्त होणाऱ्या शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमासही ते उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार बुधवार दि. २९ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता मुंबई येथून शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. गुरुवार दि. ३० रोजी ११ वाजता अभ्यागतांसाठी राखीव, दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे खरीप हंगाम-२०२६ आढावा, टंचाई, पांदण रस्ते आढावा बैठक. दुपारी २.३० वाजता पेनटाकळी प्रकल्पाअंतर्गत मौजे देवदरी ता. चिखली या गावाचे पुनर्वसनाबाबत बैठक. दुपारी ३ वाजता खडकपुर्णा प्रकल्पाअंतर्गत विविध विषयांबाबत बैठक व दुपारी ४ वाजता जिगाव प्रकल्पाबाबत आढावा बैठक. सायंकाळी ५ वाजता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या तरतुदीनुसार शासकीय जमिनीवरील दि. १ जानेवारी २०११ पर्यंतची अतिक्रमणे नियमित करणेबाबत बैठक. सर्व बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे होईल. सायंकाळी ५.३० वाजता राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पदाधिकारी यांची बैठक.

शुक्रवार दि. १ मे रोजी सकाळी ८ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे महाराष्ट्र दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमासाठी उपस्थिती व दुपारी सोईनुसार साताराकडे प्रयाण होतील.

# बुलडाणा अर्बनच्या अयोध्या भक्तनिवासचे थाटात उद्घाटन

## गंगा नदी आरती प्रमाणेच शरयु नदी आरतीची सुरू केली परंपरा

जनसंचलन/बुलढाणा

बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी च्या वतीने मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाचे जन्मस्थळ असलेल्या अयोध्या उत्तर प्रदेश येथे भक्तनिवास व भोजनालयाचे पारीवारीक उद्घाटन नुकतेच पार पडले. या भक्तनिवासचे उद्घाटन बुलडाणा अर्बन चॅरीटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ. कोमलताई सुकेश झंवर यांचे शुभहस्ते व बुलडाण्याचे विधान परिषद सदस्य आमदार धीरज लिंगाडे व इतर मान्यवरांसह बुलडाणा अर्बन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी बुलडाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर यांचे उपस्थितीत पार पडले..

बुलडाणा अर्बन संस्था ही सामाजीक उपक्रमात नेहमीच अग्रेसर असुन संस्थेच्या ग्राहक सभासदांना बँकींग सेवेसोबतच सामाजिक व धार्मिक सेवा सुविधा पुरविण्यात अग्रेसर असते. संस्थेने नुकतेच अयोध्या येथे ४८ ए.सी रुम्सचे भक्तनिवास व भोजनालयाचा शुभारंभ करण्यात आला. या भक्तनिवासचे उद्घाटन बुलडाणा अर्बन चॅरीटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ. कोमलताई सुकेश झंवर यांचे हस्ते व बुलडाण्याचे विधान परिषद सदस्य आमदार श्री.धीरज लिंगाडे, ॲड.गणेश पाटील, बुलडाणा अर्बन परिवाराचे सर्वे सर्वा श्री. राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी बुलडाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर, उपाध्यक्ष विनोद केडीया तसेच संस्थेचे संचालक डॉ. किशोर केला, नंदकिशोर बाहेती, डॉ. विनोद भंडारी, कांतीलाल छाजेड, अंबेश बियाणी, नंदकिशोर झंवर, दिनेश गांधी,अजय सेंगर तसेच संस्थेचे सनदी लेखापाल सचिनवैद्य,विनोदगांधीआदीच्याउपस्थितीतपारपडले..



या भक्तनिवासचे शुभारंभाची सुरवात शरयु नदीच्या आरतीने करण्यात आली. दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता नया घाट येथे स्थानिक अकरा पंडीतांचे मार्गदर्शनात विधीवत संकल्प करुन शरयु नदीची आरती करण्यात आली या प्रसंगी निमंत्रीत १५० भक्तांच्या हस्ते शरयु नदीची आरती करण्यात आली, तर दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता पंडीत सुमधुर शास्त्री व पंडीत श्री. राम तिवारी यांच्या मधुरवाणीत सुंदरकांड आयोजीत करण्यात आले त्यानंतर रामनामाचे संकीर्तन करण्यात आले व त्यानंतर बुलडाणा अर्बन चॅरीटेबल सोसाययटी च्या अध्यक्षा सौ. कोमलताई सुकेश झंवर याचेहस्ते भक्तनिवासचे रितसर उद्घाटन करण्यात आले. या भक्तनिवासचे निवासी बुकींग संस्थेच्या सर्व शाखांमधुन करता येणार असल्याने भाविकभक्तांनी संस्थेच्या या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन बुलडाणा अर्बन संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांनी केले आहे.

या कार्यक्रमास संस्थेचे सर्व संचालक,विभागीय व्यवस्थापक, कर्मचारी तसेच स्थानीक प्रतिष्ठीत व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# पाणी टंचाई निवारणार्थ बुलढाणा तालुक्यातील पिंपळगाव सराई,हनवतखेड व गिरडा गावासाठी टँकर मंजूर

जनसंचलन/बुलढाणा

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील पिंपळगाव सराई, हनवतखेड व गिरडा गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली. पिंपळगाव सराई येथे ५९२ पशुधन व ५ हजार ५९२ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे १ लाख २९ हजार ६०० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. हनवतखेड येथे १७९ पशुधन व ४३८ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे १४ हजार ४२० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. गिरडा येथे ३३० पशुधन व १ हजार १६ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे २४ हजार ९२० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निविदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.




# बुलढाणा पेटलं! लोकशाहीचा गळा घोटला; प्रशांत आंबी अटकेत!

जनसंचलन बुलढाणा

कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या जाहीर वाचनावरून बुलढाण्यात प्रचंड तणाव निर्माण झाला असून पोलिसांनी थेट कारवाई करत प्रकाशक प्रशांत आंबी यांना अटक केल्याने वातावरण अधिकच पेटलं आहे. मंगळवारी शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांच्या घरासमोर संविधानिक पद्धतीने पुस्तक वाचन करण्याचा निर्धार आंबी यांनी केला होता. मात्र, त्याआधीच बुलढाणा पोलिसांनी त्यांना जिल्ह्यात प्रवेश करताच रोखत अटक केली. सिटी न्यूजफच्या खतरनाक कव्हरेजमध्ये उघड झाले की, आंबी यांना चिखली परिसरात ताब्यात घेऊन अज्ञात ठिकाणी हलवण्यात आले आहे. या कारवाईमुळे लोकशाही हक्कांवर गदा आल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, केवळ पुस्तकातील उल्लेखावरून आमदार गायकवाड यांनी आंबी यांना अश्लील खालच्या दर्जाचे शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप आहे.या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली आज भव्य मोर्चा निघणार होता. यासाठी राज्यभरातून ५०० हून अधिक पुरोगामी कार्यकर्ते बुलढाण्यात दाखल झाले होते. मात्र, पोलिसांनी केवळ आंबी यांनाच नाही तर सभेचा मंडपही काढायला लावल्याने संतापाची लाट उसळली आहे.प्रशांत आंबी यांनी ङसिटी न्यूजफशी बोलताना स्पष्ट शब्दांत सांगितले, आम्ही शांततेत संविधानिक मार्गाने पुस्तक वाचन करणार होतो, पण पोलिसांनी आम्हाला बुलडाणा पोहचन्या अगोदरच २५ किमी आधीच अडवून अटक केली. शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांच्यावर दखलपात्रगुन्हा दाखल झाला पाहिजे.दरम्यान, शेतकरी नेते अजित नवले यांनीही या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत पोलिसांवर पक्षपातीपणाचा आरोप केला आहे. बुलढाण्यातील ही घटना आता राज्यभर गाजण्याची



चिन्हे असून सिटी न्यूज या प्रकरणावर बारीक नजर ठेवून आहे. मोर्चेकरी जवळपास ६३५ किलो मीटर अंतरावरून प्रवास करून लोकशाही मार्गाने न्याय मिळावा करीता आंदोलन करण्यासाठी बुलडाणा शहरातील जिजामाता प्रेक्षागार परिसर येथे आले होते कडकडत्या उन्हात आंदोलन ठिकाणी लावलेले मंडप,पिण्याचे पाणी संबंधित ठेकेदार यांनी परत कुणाच्या सांगण्यावरून नेले हे मोर्चे करी कोरड्या घश्यातून ओरडून सांगत होते पण ते ऐकायला कुठला ही राजकीय,शासकीय माणसाला पाझर फुटले नाही फक्त बघ्याची भूमिका घेणारे पहात होते. बुलडाणा येथे कॉम्रेड संघटनेचा कुठला ही कार्यकर्ता किंवा पदधिकारी आंदोलन ठिकाणी दिसून आला नाही.हे विशेष

# तत्परतेने वाचवला जीव; भाजप पदाधिकाऱ्यांचे मानवतावादी कार्य कौतुकास्पद



जनसंचलन/बुलढाणा

शहरातील सरस्वती नगर परिसरात घडलेल्या एका घटनेत, भाजप पदाधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळे एका जखमी व्यक्तीचा जीव वाचल्याची हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. मुख्य रस्त्यावर एक व्यक्ती गंभीर जखमी अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसताच भाजप शहराध्यक्ष मंदार बाहेकर आणि जिल्हा कार्यालय मंत्री मुकुंद देशपांडे यांनी क्षणाचाही विलंब न लावता मदतीसाठी धाव घेतली. घटनास्थळी रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याचे लक्षात येताच त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जखमी व्यक्तीला स्वतःच्या वाहनातून तातडीने सरकारी दवाखान्यात दाखल केले. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, वेळेत उपचार मिळाल्यामुळे त्या व्यक्तीची प्रकृती आता स्थिर असून तो धोक्याबाहेर आहे. या घटनेमुळे उपस्थित नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, बाहेकर आणि देशपांडे यांच्या तत्पर निर्णयक्षमतेचे व मानवतावादी दृष्टिकोनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गो-सन्मान अभियानास अभूतपूर्व प्रतिसाद, शहरात भव्य रॅली



जनसंचलन/बुलढाणा

शहरात आज गो-सन्मान आवाहन अभियान अंतर्गत भव्य रॅली आणि निवेदन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला शिवप्रेमी, गोभक्त आणि विविध हिंदुत्ववादी संघटनांचा उत्स्फूर्त आणि मोठा प्रतिसाद लाभला. सकाळी १० वाजता जिजामाता प्रेक्षागार येथून रॅलीची सुरुवात झाली. शहरातील मुख्य मार्गांवरून मोठ्या उत्साहात ही रॅली तहसीलदार कार्यालयावर पोहोचली. यावेळी शिष्टमंडळाने प्रशासनाला गोमातेच्या संरक्षण आणि सन्मानाबाबत सविस्तर निवेदन सादर केले. या अभियानात सहभागी झालेल्या हजारो नागरिकांनी गोमाता की जयफ्र आणि गोहत्या बंद कराअशा घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून टाकले. वातावरणात देशभक्ती आणि धार्मिक भावनेचा उत्साह स्पष्टपणे जाणवत होता. अभियानाच्या प्रमुख मागण्यांमध्ये संपूर्ण देशात गोहत्या बंदीचा कडक कायदा लागू करणे, गोमातेला राष्ट्रीय धरोहर किंवा राष्ट्रमाता म्हणून मान्यता देणे तसेच केंद्र स्तरावर स्वतंत्र गो-मंत्रालयस्थापन करणे यांचा समावेश आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश समाजात गो-संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण करणे आणि गोमातेचा सन्मान टिकवून ठेवणे हा असल्याचे आयोजकांनी सांगितले

